# पोलीस आयुक्तालय, नवी मुंबई CB 16/2026

## प्रेस नोट

| गुन्हे शाखा, नवी मुंबई | दिनांक ११/०३/२०२६ |
|---|---|

**''शेळी फार्मच्या नावाखाली अंमली पदार्थाची विक्री करणाऱ्या पाहिजे आरोपींना ताब्यात घेवून ५ लाख ३९ हजार रूपये किंमतीचा अंमली पदार्थ जप्त''**

पोलीस आयुक्त, नवी मुंबई, श्री.मिलिंद भारंबे, पोलीस सह आयुक्त, श्री.संजय येनपूरे, अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, श्री.दिपक साकोरे, पोलीस उप आयुक्त, गुन्हे शाखा, श्री.सचिन गुंजाळ यांनी नवी मुंबई नशामुक्त करण्याचे व अंमली पदार्थ सेवन व विक्री करणाऱ्या इसमांविरुध्द कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत.

तळोजा पोलीस ठाणे गु.रजि.नंबर ३८४/२०२५ एन.डी.पी.एस.कायदा कलम ८(सी), १७(ब), २१(ए), २१(बी), २१(सी), २२(ए), २७(ए), २९, सह भा.न्या.सं.कलम १११ या गुन्हयातील पाहिजे आरोपी वसीम लुंगीवाला व अम्रान पटेल हे सेक्टर–१३/ई, कळंबोली येथील कादरी गोट फार्म या ठिकाणी असल्याची माहिती अंमली पदार्थ विरोधी कक्षाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री.संदिप निगडे यांना मिळाली.

त्याअनुषंगाने दिनांक १०/०३/२०२६ रोजी वपोनि संदीप निगडे व अंमली पदार्थ विरोधी कक्षाकडील अधिकारी/अंमलदार यांनी सेक्टर–१३/ई, गणेश नगर, येथील कादरी गोट फार्म या ठिकाणी छापा टाकला. आरोपी (१) मोहम्मद वसीम समशुलहक चौधरी उर्फ वसीम लुंगीवाला, वय–५० वर्षे (२) अम्रान मोहम्मद पटेल, वय–३२ वर्षे, दोघे रा. कळंबोली, नवी मुंबई यांना ताब्यात घेतले. त्याचेकडे सखोल तपास करता ते शेळी फार्मच्या नावाखाली अंमली पदार्थाची विक्री करीत असल्याचे निष्पन्न झाले. आरोपीचे ताब्यातून १३ ग्रॅम वजनाचा ५,३९,२००/– रूपये किंमतीचा मेफेड्रॉन (एमडी) पावडर हा अंमली पदार्थ जप्त केला. आरोपींना अटक केली असून दिनांक १२/०३/२०२६ रोजी पर्यत पोलीस कोठडी मंजूर आहे. गुन्हयाचा तपास वपोनि श्री.संदिप निगडे करत आहेत.

आरोपीचा पुर्व इतिहासाची पडताळणी केली असता आरोपीत नामे मोहम्मद वसीम समशुलहक चौधरी उर्फ वसीम लुंगीवाला हा पूर्वी मुंबई येथे राहण्यास असून सध्या तो कळंबोली येथे राहण्यास आला आहे. त्याचेविरूध्द मुंबई परिसरात खालीलप्रमाणे १४ गुन्हे दाखल आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | गु. अ. वि. गु. र. क्र. १२३/२००७, भादंवि कलम ३८०, ४११. | ८) | डी. बी. मार्ग पोलीस ठाणे गु. र. क्र. २२९/२००७, भादंवि कलम ३८०, ३४. |
| २) | गु. प्र. शा. गु. अ. वि. गु. र. क्र. १२४/२००७, भादंवि कलम ३८०, ४११. | ९) | पायधूनी पोलीस ठाणे गु. र. क्र. २२०/२००६, भादंवि कलम ४५४, ४५७, ३८०. |
| ३) | गु. प्र. शा. गु. अ. वि. गु. र. क्र. १२७/२००७, भादंवि कलम ३८०, ४११. | १०) | मा. र. आं. मार्ग पोलीस ठाणे गु. र. क्र. ३८८/२००७, भादंवि कलम ४५४, ४५७, ३८०. |
| ४) | गु. प्र. शा. गु. अ. वि. गु. र. क्र. १३०/२००७, भादंवि कलम ३८०, ४११. | ११) | वरळी पोलीस ठाणे गु. र. क्र. १५४/२००६, भादंवि कलम ४५७, ३८०, ४२७, ३४. |

| | | | |
|---|---|---|---|
| ५) | गु. प्र. शा. गु. अ. वि. गु. र. क्र. १३१/२००७, भादंवि कलम ३८०, ४११. | १२) | कळंबोली पोलीस ठाणे गु. र. नं. १९८/२०२४, भादंवि कलम ४९८, ४०६. |
| ६) | गु. प्र. शा. गु. अ. वि. गु. र. क्र. १३२/२००७, भादंवि कलम ३८०, ४११. | १३) | आर. किडवाई पोलीस ठाणे गु. र. नं. ९६/२०१९, भादंवि कलम ३२३, ३२६, ५०४, ३४. |
| ७) | वरळी पोलीस ठाणे गु.र.क्र. २५३/२००७, भादंवि कलम ३८०, ३४. | १४) | बांद्रा कुर्ला पोलीस ठाणे गु. र. नं. ४१८/२०२१, मो.वा.का.कलम १८८. |

सदरची उल्लेखनिय कामगिरी श्री.धर्मपाल बनसोडे, सहा.पोलीस आयुक्त, अ.मा.वा.वि.कक्ष, गुन्हे शाखा, नवी मुंबई, अति.कार्य.आर्थिक गुन्हे शाखा यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.संदिप निगडे व अंमली पदार्थ विरोधी कक्षाकडे कार्यरत असणारे पोलीस अधिकारी/अंमलदार यांचे पथकाने केली आहे.

★★★★★★★★★★

